रासनिप्रा

# राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
# महाराष्ट्र राज्य, पुणे

जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, ५ बी. जे. रोड, पुणे –४११००१.

फोन नं. - (०२०) २६०५०६४१

मेल आयडी - sceapune@gmail.com वेब साईट - scea.maharashtra.gov.in

जा.क्र.रासनिप्रा/ कक्ष- ११/ बाजार समिती/जा.वै.प्रमाणपत्र / २४३८/सन २०२३ दिनांक : ३०/०३/२०२३

वाचले :- १. महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ कलम १४ अ (१) (अ)

निवडणूक प्राधान्य

२. महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम १३ (१)

३. महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समित्या (समितीची निवडणूक) नियम २०१७ चे नियम २१ (३)

३. महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समित्या (समितीची निवडणूक) नियम २०१७ चे नियम ३ (चार)

४. मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ नागपूर यांनी याचिका क्र. ३६१३/२०२२ व इतर संलग्न ४३ याचिकांमध्ये पारीत केलेले अंतरिम आदेश दिनांक ०५.०१.२०२३

५. या प्राधिकरणाकडील पत्र जा.क्र. २१५६/सन २०२३, दिनांक २१.०३.२०२३

६. सहकार, पणन व वस्त्रोदयोग विभागाकडील आदेश क्रमांक कृबास ०३२३/प्र.क्र. १३६/२१ स, दिनांक ३०.३.२०२३

**प्रस्तावना :-**

ज्या अर्थी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम १४ अ (१) (अ) मधील तरतुदीनुसार राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूकांचे अधिक्षण, निर्देशन व नियंत्रण करण्याची जबाबदारी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणावर सोपवलेली आहे. आणि,

ज्या अर्थी, मा. उच्च न्यायालयाचे संदर्भ क्र. ४ च्या आदेशानुसार राज्यातील निवडणूकीस पात्र कृषि उत्पन्न बाजार समितीच्या निवडणूक प्रक्रिया दिनांक ३०.०४.२०२३ पर्यंत पूर्ण करणेबावत आदेशित केलेले असल्यामुळे प्राधिकरणाने संदर्भ क्र. ५ चे आदेश पारीत करुन राज्यातील निवडणूकीस पात्र कृषि उत्पन्न बाजार समितीच्या निवडणूक प्रक्रिया दिनांक २७.०३.२०२३ पासून सुरु केलेल्या आहेत. निवडणूक कार्यक्रमानुसार दिनांक २[illegible].०३.२०२३ ते दिनांक ०३.०४.२०२३ या कालावधीत इच्छुक उमेदवारांकडून नामनिर्देशनपत्र दाखल केली जाणार आहेत. तसेच प्राप्त नामनिर्देशनपत्रांची छाननी दिनांक ०५.०४.२०२३ रोजी होणार आहे. आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम १३ (१) मधील तरतुदीनुसार संबंधित बाजार समितीच्या बाजार क्षेत्रात राहणारे १५ शेतकरी हे त्या बाजार समितीच्या बाजार क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या कृषि पतसंस्था सदस्य, बहुउद्देशीय सहकारी संस्था सदस्य व ग्रामपंचायत सदस्यांकडून निवडले जाणार आहेत. सदर १५ शेतकऱ्यांपैकी ११ शेतकरी हे सहकारी संस्थेचा मतदार संघ व ४ शेतकरी हे ग्रामपंचायतीचा मतदार संघातून निवडले जाणार आहेत. सहकारी संस्थेच्या मतदार संघात महिला प्रवर्गाकरीता २, इतर मागास प्रवर्गाकरीता १ आणि विमुक्त जाती किंवा भटक्या जमाती प्रवर्गाकरीता १ जागा राखीव आहे. तसेच ग्रामपंचायतीचा मतदार संघात अनुसुचित जाती किंवा अनुसुचित जमाती प्रवर्गाकरीता १ आणि आर्थिकदृष्टया दुर्बल घटक प्रवर्गाकरीता १ जागा राखीव आहे. आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समित्या (समितीची निवडणूक) नियम २०१७ चे नियम २१ (३) मधील तरतुदीनुसार राखीव प्रवर्गातील व्यक्तींनी नामनिर्देशन पत्रासोबत स्वत: प्रमाणित केलेले जातीचे प्रमाणपत्र तसेच सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जात वैधता प्रमाणपत्र जोडणे अनिवार्य आहे. मात्र जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास मुदत मिळणेबाबतची विनंती प्राधिकरणाकडे होत आहे. जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याकरीता मुदत



Scanned with CamScanner

देण्याबाबतची तरतुद महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समिती (समितीची निवडणूक) नियम २०१७ या नियमात नमूद नाही. आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम ५९ अन्वये प्राप्त अधिकाराचा व त्यासंदर्भात शासनास प्राप्त असलेल्या इतर सर्व शक्तींचा वापर करुन शासनाने याचाये क्रमांक ६ च्या आदेशानुसार महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समित्या (समितीची निवडणूक) नियम २०१७ चे नियम २१ (३) मधून आदेशात नमुद अटीच्या अधिन राहुन सूट दिलेली असल्यामुळे राखीव प्रवर्गातील व्यक्तींनी नामनिर्देशन पत्रासोबत सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जात वैधता प्रमाणपत्र जोडण्याची आवश्यकता राहीलेली नाही. आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समिती (समितीची निवडणूक) नियम २०१७ चे नियम ३ (चार) मधील तरतुदीनुसार कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूका सुरळीतपणे व मुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी अधिनियम व नियमांच्या तरतुदींशी सुसंगत असतील असे विशेष किंवा सर्वसाधारण आदेश पारीत करण्याचे अधिकार प्राधिकरणास प्राप्त आहेत.

त्या अर्थी, प्राधिकरण राखीव प्रवर्गातील व्यक्तींनी नामनिर्देशन पत्रासोबत सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला जात वैधता प्रमाणपत्र जोडणे संदर्भात खालील प्रमाणे आदेश देत आहे.

**-:: आदेश ::-**

महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम १४ अ (१) (अ) व महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समिती (समितीची निवडणूक) नियम २०१७ चे नियम ३ (चार) मधील तरतुदी अन्वये प्राप्त अधिकारानुसार प्राधिकरण राखीव प्रवर्गातील व्यक्तींनी नामनिर्देशन पत्रासोबत सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला जात वैधता प्रमाणपत्र जोडणे संदर्भात खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

१. राखीव प्रवर्गातील व्यक्तींने नामनिर्देशन पत्रासोबत स्वत: प्रमाणित केलेले जातीचे प्रमाणपत्र सादर करावे.
२. राखीव प्रवर्गातील व्यक्तींनी जात पडताळणी समितीकडे जात वैधता प्रमाणपत्र मिळण्यासाठीचा अर्ज करावा व अर्जासोबत निवडणूक निर्णय अधिकारी यांनी निर्गमीत केलेला नमुना १५ अ मधील प्रमाणपत्र सादर करावे. **(परिशिष्ट १)**
३. राखीव प्रवर्गातील व्यक्तींने निवडून आल्याच्या दिनांकापासून बारा महिन्यांच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करील याबाबतचे विहित नमुन्यातील हमीपत्र सादर करावे. **(परिशिष्ट २)**
४. कृषि उत्पन्न बाजार समितीवर निवडून आल्याच्या दिनांकानंतर बारा महिन्याच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास कसूर केल्यास तिची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द होईल आणि ती सदस्य राहण्यास अपात्र ठरेल.

**मा. आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मान्यतेने.**

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे-१

(डॉ.पी.एल.खंडागळे)
सचिव,
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

**प्रत :-**

१. जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ.उ.बा.स.) (सर्व)
२. निवडणूक निर्णय अधिकारी (संबंधित)

**प्रत माहितीस्तव :-**

१. मा.अपर मुख्य सचिव (पणन), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. मा.पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे

SHOT ON MI
MI DUAL CAMERA



E:\ROO\circular work\APMC-OBSERVER oder.docx

Scanned with CamScanner

(राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाकडील आदेश जा.क्र. रासनिप्रा/ कक्ष- ११/ बाजार समिती/ जा. वै. प्रमाणपत्र/ /सन २०२३, दिनांक /०३/२०२३ सोबत जोडलेला नमुना )

(परिशिष्ट १)

## नमूना १५ अ

## निवडणूक निर्णय अधिकारी यांनी दयावयाचे प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की,

१. कृषि उत्पन्न बाजार समिती, ------------------ , ता. -----------------, जि. ------------------ या बाजार समितीची निवडणूक प्रक्रिया दिनांक --------------------- रोजी पार पडणार आहे.

२. कृषि उत्पन्न बाजार समिती, ------------------ , ता. -----------------, जि. ------------------ या बाजार समितीचा निवडणूक कार्यक्रम स्थानिक वर्तमान पत्रात दिनांक -------------- रोजी प्रसिध्द केलेला आहे.

३. प्रमाणित करण्यात येते की, इच्छुक उमेदवार श्री./श्रीमती ---------------------------------------- ------------- हे महाराष्ट्रातील मुळ रहिवाशी आहेत.

४. श्री./श्रीमती ---------------------------------------------------- हे/या कृषि उत्पन्न बाजार समिती, --------------- , ता. -----------------, जि. ---------------------- या बाजार समितीच्या निवडणूकीत ----------------------------------- या मतदारसंघातून निवडणूक लढवित असून त्यांनी --------------- या जातीचे प्रमाणपत्र सादर केलेले आहे.

जात पडताळणी समितीला विनंती करण्यात येते की, त्यांनी सहा महिन्यांच्या आत संबंधीत उमेदवाराचे जात प्रमाणपत्र दावा पडताळणी करुन तसे अवगत करावे.

ठिकाण :-

दिनांक :-

सही व शिक्का
निवडणूक निर्णय अधिकारी,
कृषि उत्पन्न बाजार समिती, -------- ता. -------, जि. ---------

(डॉ. पी. एल. खंडागळे)
सचिव
राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण
महाराष्ट्र राज्य, पुणे.



...APMC - OBSERVER oder.docx
Scanned with CamScanner

(राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाकडील आदेश जा.क्र. रासनिप्रा/ कक्ष- ११/ बाजार समिती/ जा.वै.प्रमाणपत्र/ /सन २०२३, दिनांक /०३/२०२३ सोबत जोडलेले हमीपत्र)

(परिशिष्ट २)

## हमीपत्र

मी, श्री./श्रीमती ------------------------------------------------------------------ वय ----- वर्षे, राहणार ---------------------------------------------------------------------------- (पत्ता) खालीलप्रमाणे हमीपत्र करतो/करते की,

1. मी ---------------------------------------- कृषि उत्पन्न बाजार समिती ------------, ता. ------------, जि.--------------- या बाजार समितीच्या निवडणूकीसाठी ------------------------------------------- या मतदार संघातील ----------------------------------- राखीव जागेकरीता नामनिर्देशनपत्र सादर करीत आहे.
2. माझ्याजवळ जात पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र नसल्यामुळे मी जात पडताळणी समितीकडे जातीचे प्रमाणपत्र तपासणीसाठी सादर केलेले आहे/सादर करणार आहे. जात वैधता प्रमाणपत्र निवडून आल्याच्या दिनांकापासून बारा महिन्यांच्या कालावधीत सादर करण्याबाबतची हमी या हमीपत्राद्वारे देत आहे.
3. निवडून आल्याच्या दिनांकापासून बारा महिन्यांच्या मुदतीत वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास कसूर केल्यास माझी निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द होईल आणि मी बाजार समितीची सदस्य म्हणून चालु राहण्यास अपात्र ठरेन याची मला जाणीव आहे.

(उमेवदाराची सही किंवा अंगठयाचा ठसा)

स्थळ :-

दिनांक :-

माझे समक्ष
निवडणूक निर्णय अधिकारी,
कृषि उत्पन्न बाजार समिती, -------, ता.---------, जि.---------

(डॉ. पी. एल. खंडागळे)
सचिव
राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण
महाराष्ट्र राज्य, पुणे.



SHOT ON MI A1
MI DUAL CAMERA
Scanned with CamScanner